) बुधवार दि. २२ नोव्हेंबर १९८९

केसरी

# कमला महाविद्यालयाचे क्रीडास्पर्धेत वर्चस्व

(आमच्या वार्ताहराकडून)

राशिवडे : करवीर तालुका व कोल्हापूर शहर महिला क्रीडा स्पर्धेतील खो-खो, बास्केटबॉल, व्हॉलीबॉलमध्ये प्रथम, तर कबड्डी, हँडबॉलमध्ये द्वितीय क्रमांक मिळवून कोल्हापूरच्या कमला महाविद्यालयाने बुधवारी या स्पर्धेतील सांघिक विभागात आपले वर्चस्व प्रस्थापित केले.

करवीर तालुक्यातील कुडित्रे येथील डी. सी. नरके विद्यानिकेतनच्या क्रीडांगणावर कालपासून या स्पर्धेची सुरुवात झाली. कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी नलिनी पाटील यांच्याहस्ते स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. अध्यक्षस्थानी सौ. विमल पाटील होत्या. डी. सी. नरके विद्यानिकेतनचे प्राचार्य एस. ए. मंडोलकर यांनी प्रास्ताविक केले, तर करवीर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी एम. एन. जाधव यांनी आभार मानले.

करवीर तालुका व कोल्हापूर शहरातील माध्यमिक शाळा, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील एकूण ४०० महिला स्पर्धकांनी या स्पर्धेत भाग घेतला आहे. काल घेण्यात आलेल्या सांघिक विभागाचा सविस्तर निकाल असा-

खो-खो-प्रथम-कमला महाविद्यालय, कोल्हापूर, द्वितीय-महालक्ष्मी क्रीडा मंडळ, कोल्हापूर.

बास्केटबॉल प्रथम-कमला महाविद्यालय, कोल्हापूर द्वितीय-न्यु कॉलेज, कोल्हापूर.

व्हॉलिबॉल- प्रथम-कमला महाविद्यालय, कोल्हापूर. द्वितीय- महालक्ष्मी स्पोर्टस् क्लब, कोल्हापूर.